# प्रकरण ६ भारतीय वायुसेना




ब्रिटिश काळात 'रॉयल इंडियन एअर फोर्सची' स्थापना १९३२ मध्ये झाली. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रॉयल इंडियन एअर फोर्सचे नाव 'भारतीय वायुसेना' असे करण्यात आले.

## भारतीय वायुसेनेची संघटना

भारतीय वायुसेनेचे एकूण सात विभाग (कमांड्स) आहेत. त्यांतील पाच (ऑपरेशनल) कमांड्स निकडीच्या कामावर आधारित आहेत. एक देखभाल दुरुस्ती (मेंटेनन्स कमांड) आणि एक प्रशिक्षण विभाग (ट्रेनिंग कमांड) आहे. ते पुढीलप्रमाणे...

| अ.क्र. | कमांड्स | मुख्य कार्यालय | |
|---|---|---|---|
| (१) | सेंट्रल एअर कमांड | अलाहाबाद | निकडीच्या कामावर आधारित |
| (२) | इस्टर्न एअर कमांड | शिलाँग | |
| (३) | वेस्टर्न एअर कमांड | नवी दिल्ली | |
| (४) | साऊथ वेस्टर्न एअर कमांड | गांधीनगर | |
| (५) | सदर्न एअर कमांड | तिरुअनंतपुरम | |
| (६) | मेंटेनन्स एअर कमांड | नागपूर | देखभाल दुरुस्तीसाठी |
| (७) | ट्रेनिंग एअर कमांड | बंगळूरु | प्रशिक्षण विभागासाठी |

## वायुसेनेचे कार्य :

- भारतीय हवाई हद्दीचे संरक्षण करणे.
- स्थलसेना व नौसेनेला युद्धात मदत करणे.
- आवश्यकतेनुसार भारताच्या सीमेपलीकडे जाऊन आपल्या राष्ट्रहिताचे रक्षण करणे.
- आपत्ती काळात बचावकार्यात सहकार्य करणे इत्यादी.

## भारतीय वायुसेनेतील विमाने




**एस यु ३० MKI (सुखोई ३०) :** हे बहुकर्मी लढाऊ विमान आहे. सुखोई ३० विमानात दोन इंजिने व दोन पायलट असतात. हे विमान रशियन बनावटीचे असून त्याचे भारतात उत्पादन केले जाते.

**मिराज २००० (वज्र) :** हे विमान फ्रेंच बनावटीचे विमान असून हवाई संरक्षण व शत्रूच्या विमानांशी झुंज देणारे लढाऊ विमान आहे. या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो.






**मिग २९ :** हे विमान रशियन बनावटीचे असून हवाई वर्चस्व निर्माण करणारे लढाऊ विमान आहे. या विमानात दोन इंजिने व एक पायलट असतो.

**मिग २७ :** हे विमान रशियन बनावटीचे असून युद्धकलात्मक आघात (Tactical Strike) करणारे विमान आहे. या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो.





**मिग २१ :** हे रशियन बनावटीचे विमान आहे. ते जमिनीवर आघात करणारे तसेच शत्रूच्या विमान विरोधात लढणारे बहुकर्मी लढाऊ विमान आहे. या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो.



**जाग्वार :** हे अँग्लो फ्रेंच बनावटीचे विमान असून शत्रू प्रदेशात खोलवर जाऊन मारा करणारे विमान आहे. या विमानात एक पायलट आणि दोन इंजिने असतात.

**सी १३० जे :** हे विमान रणांगणावर अत्यंत कमी लांबीच्या आणि कच्च्या धावपट्टीवर उतरणारे, हवाई छत्रीधारी, अवजड साहित्य, जखमींची ने-आण करण्यासाठी सक्षम आहे.





**IL 76 :** हे रशियन बनावटीचे अवजड वाहतुकीचे लष्करी विमान आहे. या विमानात चार इंजिने असतात.



**MI25/MI35 :** हे दोन टर्बोशाफ्ट इंजिने असलेले हल्ला करणारे चिलखती गाड्या/रणगाडा विरोधी हेलिकॉप्टर आहे.



**सी १७ :** या विमानाची एका टप्प्यात ४२०० ते ९००० कि.मी. अंतरापर्यंत ४० ते ७० टन वजन वाहून नेण्याची क्षमता आहे.

**AN 32 :** हे रशियन बनावटीचे मध्यम आकाराचे वाहतुकीचे विमान असून त्याला दोन टर्बो इंजिने असतात.



**MI26 :** हे रशियन बनावटीचे दोन टर्बोशाफ्ट इंजिन असलेले अवजड वाहतुकीचे हेलिकॉप्टर आहे.






**MI17-V5 :** या हेलिकॉप्टरवर हवाई वाहतुकीसाठीची इलेक्ट्रॉनिक उपकरणे, हवामानविषयक रडार ही उपकरणे असतात. तसेच रात्रीच्या वेळी कार्यवाही करताना आणि टेहळणी दरम्यान हेलिकॉप्टरच्या पायलटला रात्रीच्या वेळी रणांगणावरील दृश्ये पाहण्यासाठीचे गॉगल्स दिलेले असतात.




**चिताह :** हे फ्रेंच बनावटीचे एक टर्बोशाफ्ट इंजिन असलेले हेलिकॉप्टर आहे. या हेलिकॉप्टरचे मुख्य कार्य टेहळणी करणे व जखमींची ने-आण करणे आहे.




**ध्रुव :** हे भारतीय बनावटीचे वाहतुकीचे हेलिकॉप्टर आहे. हे हेलिकॉप्टर पर्वतीय क्षेत्रात ६ हजार मीटर उंचीवर सक्षमपणे कार्य करू शकते.

**चेतक :** हे एक इंजिन असलेले हलके, फ्रेंच बनावटीचे टेहळणी हेलिकॉप्टर आहे.






**तेजस :** हे भारतीय बनावटीचे स्वदेशी हलके लढाऊ विमान आहे. भारतीय वायुसेनेत तेजस विमान इ. स. २०१६ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.




**रुद्र :** हे भारतीय बनावटीचे हलके लढाऊ हेलिकॉप्टर पर्वतीय क्षेत्रात कार्य करू शकते.

याबरोबरच भारतीय वायुसेनेकडे विविध प्रकारची क्षेपणास्त्रे आहेत.

## उपक्रम

१. भारतीय वायुसेनेच्या युद्धकार्याची माहिती वर्तमानपत्रे, मासिके व इंटरनेटच्या माध्यमातून संकलित करा.

२. दुष्काळ, भूकंप व महापूर इत्यादींसारख्या नैसर्गिक आपत्तींमधील भारतीय वायूसेनेच्या कामाची माहिती वर्तमान पत्रे, मासिके व इंटरनेटच्या माध्यमातून संकलित करा.

(३)भारतीय वायुसेनेकडे असलेल्या क्षेपणास्त्रांची चित्रे जमा करा व माहिती संकलित करा. चिकटवहीत चिकटवा.

7XAE6B

भारतातील सेनादले नकाशा



## उपक्रम

खालील नकाशात सैन्यदलाच्या कमांडची सूची तयार करून त्यांची कार्यक्षेत्रे विविध रंगांच्या साहाय्याने दाखवा.



## उपक्रम

खालील नकाशात वायुसेना व नौसेना मुख्यालये रंगांच्या साहाय्याने दाखवा.

